


महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ■ १५ जानेवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २०० ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये


## राज्यातल्या 29 महापालिकांसाठी आज मतदान

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

राज्यातल्या २९ महापालिका निवडणुकांसाठी आज मतदान होणार आहे. विविध ठिकाणी मतदान साहित्याचं वाटप आणि कर्मचाऱ्यांना मतदान केंद्रांवर पोहोचवण्याची तयारी सुरू आहे. राज्यातल्या २९ महापालिकांसाठी उद्या सकाळी साडेसात ते साडेपाच दरम्यान मतदान होणार आहे. यासाठी निवडणूक आयोगानं दिलेलं मतदार ओळखपत्र मतदारांना दाखवता येईल. याशिवाय छायाचित्र असलेली इतर १२ ओळखपत्र दाखवली तरीसुद्धा मतदान करता येईल. या ओळखपत्रांमध्ये पारपत्र, आधार कार्ड, वाहन परवाना, पॅन कार्ड, सरकारी कर्मचाऱ्यांचे ओळखपत्र, निवृत्ती वेतनाची कागदपत्र, लोकप्रतिनिधींची ओळखपत्रं, स्वातंत्र सैनिकांचं ओळखपत्र, बँक आणि टपाल खात्याचे पासबुक, दिव्यांग दाखला, मनरेगाचं जॉब कार्ड, किंवा आरोग्य विमा योजनेचं कार्ड यांचा समावेश आहे. मुंबई वगळता राज्यातल्या इतर सर्व महापालिकांमध्ये बहुसदस्यीय प्रभाग रचना आहे. बहुतांश प्रभाग हे ४ सदस्यीय असून काही प्रभाग ३ किंवा ५ सदस्यीय आहे. त्याठिकाणी मतदानांना जितक्या सदस्यांचा प्रभाग तितकी मतं द्यावी लागणार आहे. त्यांच्या ईव्हीएमवर ४ वेगवेगळ्या रंगाच्या मतपत्रिका असतील. या प्रत्येक मतपत्रिकेवर त्या त्या क्रमांकाच्या सदस्यपदासाठी उभ्या असलेल्या उमेदवारांची यादी आणि नोटाचे बटन असेल. मतदारांना ईव्हीएममध्ये या सर्व मतपत्रिकांच्या समोर असलेलं बटन दाबावं लागेल. ज्या उमेदवाराला मत दिलं त्याच्या समोरचा लाइट लागेल. सर्व उमेदवारांना मत दिल्यावर शेवटी बीप असा आवाज येईल आणि मतदान पूर्ण झाल्याची खात्री मतदारांना मिळेल.

### संपादकीय

## चला उठा, मतदान करूया!

आज महापालिका निवडणुकीचा दिवस आहे—आपल्या शहराच्या भवितव्याचा कौल देणारा निर्णायक क्षण. पाच वर्षे शहराचा कारभार ज्यांच्या हाती सोपवायचा, ते लोकप्रतिनिधी निवडण्याची संधी आज प्रत्येक मतदाराच्या हातात आहे. लोकशाहीचा हा उत्सव केवळ प्रशासनाचा नाही, तर तो यशस्वी करण्याची खरी जबाबदारी नागरिकांचीच आहे. मतदान हा केवळ एक अधिकार नाही, तर तो सजग नागरिकत्वाचा कस आहे. पाणीटंचाई, खड्डेमय रस्ते, स्वच्छतेचा अभाव, आरोग्य सेवा, शालेय शिक्षण—हे सगळे प्रश्न महापालिकेच्या निर्णयांशी थेट जोडलेले आहेत. हे निर्णय कोण घेणार, हे ठरवणारे एकमेव साधन म्हणजे आपले मत. तरीही “माझ्या एका मताने काय फरक पडतो?” अशी मानसिकता लोकशाहीला सर्वाधिक मारक आहे. इतिहास साक्षीदार आहे की अनेक निवडणुकांचे निकाल मोजक्या मतांनीच बदलले आहेत. मतदान न करणे म्हणजे उद्याच्या गैरकारभारावर मौन संमती देण्यासारखे आहे. पाच वर्षे तक्रारी करत बसण्याआधी आज आपली जबाबदारी पार पाडणे अधिक महत्त्वाचे आहे. मतदान केंद्रावर जाण्यासाठी वेळ नाही, उत्साह नाही, अशी कारणे लोकशाहीला परवडणारी नाहीत. आजचा दिवस निर्णायक आहे. उदासीनतेला दूर सारूया, निष्क्रियतेला छेद देऊया. घराबाहेर पडा, मतदान केंद्रावर जा आणि निर्भयपणे आपला निर्णय नोंदवा. कारण मतदान केवळ मतपत्रिकेवरचा ठसा नाही—तो आपल्या शहराच्या उद्याचं भविष्य घडवणारा आवाज आहे. चला उठा, मतदान करूया!

## मतदान यंत्राला बसवले जाणार ‘पाडू’ मशीन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

महानगर पालिकांसाठी आज (दि.15) मतदान पार पडणार आहे. मात्र यावेळी निवडणूक आयोग EVM मशीनला एक नवीन ‘डिव्हाइस’ (उपकरण) जोडणार आहे. ज्याचे नाव प्रिंटिंग ऑक्झिलरी डिस्प्ले युनिट म्हणजेच पाडू असे आहे. मतदानाच्या दिवशी ईव्हिएमला नव्याने जोडले जाणारे पाडू मशीन म्हणजे प्रिंटिंग ऑक्सिलरी डिस्प्ले युनिट आहे. हे एक अतिरिक्त छोटं यंत्र आहे. मतदाराला मतदान करताना किंवा मतदान प्रक्रियेदरम्यान अधिक स्पष्ट आणि मोठ्या डिस्प्लेवर माहिती दाखवण्यासाठी ‘पाडू’ मशीन आहे. ‘पाडू’ हे VVPAT सारखं पावती देणारं यंत्र नाही. तर, मुख्यतः ऑक्सिलरी डिस्प्ले देणारं हे यंत्र आहे. जे मतदान प्रक्रिया अधिक सोपी आणि दृश्यमान बनवण्यासाठी वापरलं जाऊ शकतं. मतमोजणी करताना पाडू मशीन सर्वात आधी कंट्रोल युनिटला बॅलेट युनिट जोडून मते तपासली जातात. मात्र या जोडणीनंतरही निकाल पाहण्यात अडथळे निर्माण होत असतील तर ‘पाडू’ यंत्राचा वापर करून निवडणूक प्रक्रिया पूर्ण केली जाते. PADU मशीन मुंबईत कुठेही सरसकट वापरलं जाणार नाही. अपवादात्मक (इमरजेंसी) परिस्थितीमध्ये हे मशीन वापरलं जाईल, अशी माहिती मुंबई महानगरपालिकेकडून देण्यात आली आहे. ईव्हीएम मशीनला बॅकअप म्हणूण हे मशीन गरज पडली तर वापरलं जाईल. मशीन अचानक बंद झाली किंवा तांत्रिक अडचण आली तर हे मशीन वापरलं जाईल, अशी माहिती महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी दिली.

## ठाण्यात मतदारांना पैसे वाटप?

### पैसे वाटपाच्या आरोपावरून कार्यकर्त्यांना चोप

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** ठाणे महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माजी महापौर मिनाक्षी शिंदे यांच्या प्रभागात पैशांच्या वाटपाचा आरोप उफाळून आला असून, या प्रकारामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. युतीतून मोठ्या प्रमाणावर बंडखोरी झालेल्या या प्रभागात अपक्ष उमेदवार रिंगणात उतरले असतानाच, एका अपक्ष उमेदवाराच्या कार्यकर्त्यांकडून मतदारांना पैसे वाटप सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

मनोरमानगर, मानपाडा आणि आझादनगरचा समावेश असलेल्या प्रभाग क्रमांक तीनमध्ये ही घटना घडली. याच प्रभागातून ठाणे महापालिकेच्या माजी महापौर मिनाक्षी शिंदे निवडून आल्या आहेत. यंदाच्या निवडणुकीत महायुती झाल्यानंतर शिंदे गट आणि भाजपमध्ये बंडखोरी झाली असून, अ, ब, क आणि ड या चार जागांसाठी तब्बल ३३ उमेदवार निवडणूक लढवत आहेत.

बुधवारी सकाळपासून मतदारांना पैशांची पाकिटे वाटली जात असल्याची माहिती अपक्ष उमेदवार दत्ता घाडगे यांना मिळाली. त्यानंतर त्यांनी स्वतः घटनास्थळी जाऊन दोघांना पैशांसह पकडण्याचा प्रयत्न केला. मात्र संबंधित व्यक्ती पळून गेल्या. घटनास्थळावरून पैशांची पाकिटे जप्त करण्यात आली. या प्रकाराची माहिती मिळताच अपक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, ठाकरे गट तसेच शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. संतप्त कार्यकर्त्यांनी पैसे वाटपाचा आरोप असलेल्या दोघांना बेदम चोप दिला आणि त्यानंतर त्यांना थेट पोलीस ठाण्यात नेण्यात आले.

या घटनेमुळे संपूर्ण परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. निवडणुकीच्या तोंडावर घडलेल्या या प्रकारामुळे प्रशासन आणि पोलिसांची धावपळ उडाली असून, मतदारांमध्येही मोठी चर्चा रंगली आहे. पुढील कारवाई काय होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## शहापूर पंचायत समितीचे वीज देयक थकले - बांधकाम विभाग अंधारात

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर : ठाणे जिल्हा परिषदेच्या दुर्लक्षामुळे शहापूर पंचायत समितीच्या बांधकाम विभागाचा कारभार अंधारात गेल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे. वीज देयकासह इतर प्रशासकीय खर्चासाठी वारंवार मागणी करूनही निधी न मिळाल्याने तब्बल नऊ महिन्यांचे सुमारे ७० हजार रुपयांचे वीज बिल थकीत राहिले. अखेर देयक न भरल्यामुळे वीज वितरण कंपनीने बांधकाम विभागाचा वीज पुरवठा खंडित केला आहे.**

एप्रिल ते डिसेंबर या कालावधीत बांधकाम विभागाचे वीज देयक थकत गेले होते. विभागाकडून याबाबत वेळोवेळी ठाणे जिल्हा परिषदेकडे निधीची मागणी करण्यात आली. मात्र त्याकडे सातत्याने दुर्लक्ष झाल्याने प्रशासकीय कामकाजात अडथळे निर्माण होत होते. दोन दिवसांपूर्वी वीज पुरवठा खंडित झाल्यानंतर ही बाब उघडकीस आली. वीज नसल्यामुळे गेल्या दोन दिवसांपासून बांधकाम विभागातील संपूर्ण संगणकीय कामकाज ठप्प झाले आहे. विकासकामांच्या नोंदी, अंदाजपत्रके, मोजमाप पुस्तके, तसेच देयकांची प्रक्रिया यावर मोठा परिणाम झाला आहे. परिणामी कामांच्या मंजुरीला विलंब होत असून ठेकेदारांनाही आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. याचा सर्वाधिक फटका ग्रामीण भागातून येणाऱ्या ग्रामस्थांना बसत आहे. विविध कामांसाठी पंचायत समिती कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना काम न झाल्याने पुन्हा पुन्हा फेऱ्या माराव्या लागत असून, त्यामुळे त्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाया जात असल्याची नाराजी व्यक्त केली जात आहे. प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे शासकीय कार्यालयाचा वीज पुरवठा खंडित होण्याची वेळ आल्याने जिल्हा परिषद प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

## ‘सरकारसाठी नियम बदलले जात आहेत’

### निवडणूक आयोगावर राज ठाकरे यांचा गंभीर आरोप

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई :** महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय वातावरण तापले असून, निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर थेट प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनाचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी निवडणूक आयोगावर गंभीर आरोप करत, सत्ताधारी सरकारला अनुकूल ठरण्यासाठी नियम आणि कायद्यांमध्ये वारंवार बदल केले जात असल्याचा दावा केला आहे. हरलेली बाजी जिंकण्यासाठी निवडणूक आयोग सरकारला मदत करत असल्याचा आरोपही त्यांनी केला. ते आज मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हेही उपस्थित होते.

राज ठाकरे यांनी सांगितले की, आगामी निवडणुकांमध्ये ‘प्रिंटिंग ऑक्झिलरी डिस्प्ले युनिट’ अर्थात ‘पाडू’ नावाचे नवे यंत्र वापरण्यात येणार असल्याची माहिती निवडणूक आयोगाने कोणत्याही राजकीय पक्षाला दिलेली नाही, तसेच हे यंत्र प्रत्यक्ष दाखवण्यातही आलेले नाही. या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी निवडणूक आयोगाला अधिकृत पत्र लिहून स्पष्टीकरण मागितल्याची माहितीही राज ठाकरे यांनी दिली.

तसेच मतदानाच्या आदल्या दिवशी सायंकाळी ५ वाजेपर्यंत उमेदवार आणि नेत्यांना मतदारांच्या घरी जाऊन भेटण्याची परवानगी देणारा बदल आयोगाने केल्याचा दावा करत, ही नवी पद्धत कुठून आली, असा सवाल राज ठाकरे यांनी उपस्थित केला. मात्र या आरोपांना उत्तर देताना राज्य निवडणूक आयोगने स्पष्टीकरण दिले आहे. यासंदर्भात कोणताही नवीन आदेश जारी करण्यात आलेला नसून, संबंधित आदेश हा १४ फेब्रुवारी २०१२ रोजीच जारी करण्यात आलेला जुना आदेश असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, या विषयावर सत्ताधारी पक्षाकडूनही प्रतिक्रिया देण्यात आली आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मतदारांना प्रत्यक्ष भेटणे हे पूर्णतः नियमांच्या चौकटीत असल्याचे सांगत, यामध्ये कोणताही नियमभंग होत नसल्याचे स्पष्ट केले आहे. महापालिका निवडणुकांच्या तोंडावर निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवरून राजकीय आरोप–प्रत्यारोप सुरू झाले असून, या मुद्द्यावर पुढील काळात राजकीय संघर्ष अधिक तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

### महत्वाचे




## उल्हासनगरात तीन दिवस वाहतूक बदल

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**उल्हासनगर, ता. १४ (वार्ताहर) :** उल्हासनगर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या ईव्हीएम वाटप, जमा करणे आणि मतमोजणी प्रक्रियेसाठी शहराच्या वाहतूक व्यवस्थेत मोठे बदल करण्यात आले आहेत. १४ ते १६ जानेवारी या कालावधीत पवई चौक आणि प्रांताधिकारी कार्यालय परिसर "नो-एंट्री" झोन म्हणून घोषित करण्यात आला आहे. ठाणे वाहतूक पोलिस उपायुक्त पंकज शिरसाट यांनी यासंदर्भात अधिसूचना जारी केली आहे. ही अधिसूचना १४ जानेवारी रोजी पहाटे ५:०० वाजेपासून ते १६ जानेवारी रोजी मतमोजणी पूर्ण होईपर्यंत लागू राहील. १४ जानेवारीला ईव्हीएम मशीन वाटप, १५ जानेवारीला ईव्हीएम मशीन जमा करणे, १६ जानेवारीला मतमोजणी प्रक्रिया आहे. त्यामुळे मतमोजणीच्या काळात होणारी गर्दी आणि सुरक्षितता लक्षात घेता नागरिकांनी पोलिसांना सहकार्य करावे आणि शक्यतो पर्यायी मार्गाचाच वापर करावा, असे प्रशासनाने आवाहन केले आहे.

## एसी लोकलचे पुनरागमन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई :** प्रजासत्ताक दिन अर्थात २६ जानेवारीपासून हार्बर रेल्वे मार्गावरील प्रवाशांना दिलासा मिळणार असून एसी लोकल सेवा पुन्हा सुरू होणार आहे. मध्य रेल्वे कडून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते पनवेल दरम्यान १४ वातानुकूलित लोकल सेवा सुरू करण्यात येणार आहेत. या नव्या एसी लोकल्समुळे हार्बर मार्गावरील प्रवास अधिक आरामदायी होणार आहे. मध्य रेल्वेने १ डिसेंबर २०२१ रोजी हार्बर मार्गावर प्रथम एसी लोकल सुरू केल्या होत्या, परंतु प्रवाशांच्या अत्यल्प प्रतिसादामुळे नंतर त्या बंद केल्या. मात्र, यावेळी गर्दीच्या वेळेतही एसी लोकल धावणार असल्याने ही सेवा ऑफिसला जाणाऱ्या कर्माचाऱ्यांसाठी, विशेषतः नवी मुंबईच्या दिशेने प्रवास करणाऱ्यांसाठी अधिक सोयीस्कर ठरेल, असा अधिकाऱ्यांचा विश्वास आहे. सुधारित वेळापत्रक आणि नियोजनामुळे यावेळी एसी लोकल सेवेला चांगला प्रतिसाद मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, कोरोना महामारीनंतर बहुतांश प्रवासी आरामदायी प्रवासासाठी अतिरिक्त पैसे देण्यास तयार असल्याने प्रवाशांच्या बदललेल्या वर्तनाची चाचणी म्हणूनही हार्बर मार्गाच्या एसी लोकल पुनरागमनाकडे पाहिले जात आहे.

## केडीएमसीत आठ केंद्रांवर मतमोजणी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण–डोंबिवली महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी होणाऱ्या मतमोजणीच्या पार्श्वभूमीवर प्रशासन पूर्णपणे सज्ज झाले आहे. येत्या १६ जानेवारी रोजी पालिका हद्दीतील आठ विविध केंद्रांवर मतमोजणी प्रक्रिया पार पडणार असून, सकाळी दहा वाजता मतमोजणीला सुरुवात होणार आहे

प्रत्येक मतमोजणी केंद्रावर संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या थेट मार्गदर्शनाखाली प्रक्रिया राबवली जाणार आहे. मतमोजणी सुरळीत, पारदर्शक आणि वेळेत पूर्ण होण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, तांत्रिक सुविधा तसेच सुरक्षा यंत्रणा तैनात करण्यात आली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी क्रमांक एक



यांच्या अखत्यारीतील मतमोजणी १७ मंचकांवर होणार असून, प्रभाग क्रमांक दोन व तीनमध्ये प्रत्येकी सात फेऱ्या, तर प्रभाग क्रमांक चारमध्ये पाच फेऱ्या होणार आहेत. तर निवडणूक निर्णय अधिकारी क्रमांक दोन यांच्या अखत्यारीतील मतमोजणी १४ मंचकांवर पार पडणार असून, प्रभाग क्रमांक एकमध्ये सहा, प्रभाग क्रमांक पाचमध्ये तीन, प्रभाग क्रमांक सहामध्ये चार आणि प्रभाग क्रमांक दहामध्ये तीन फेऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत.

**मतमोजणीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात येणार असून, उमेदवारांचे प्रतिनिधी आणि माध्यमांसाठी आवश्यक त्या सोयी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. त्यामुळे १६ जानेवारी रोजी होणारी मतमोजणी शांततेत आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पडेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.**

## अविनाश जाधव यांची याचिका फेटाळली

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** राज्यातील महानगरपालिका निवडणुकीत उमेदवारांच्या बिनविरोध निवडीविरोधात मनसेचे नेते अविनाश जाधव यांनी दाखल केलेली याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. उमेदवार बिनविरोध निवडून आला असेल तरीही मतदारांसाठी नोटाचा पर्याय असावा, अशी मागणी याचिकेत करण्यात आली होती. मात्र, न्यायालयाने याचिकाकर्त्यांना खडे बोल सुनावत ही याचिका फेटाळून लावली. तुम्ही न्यायालयात सकाळी चुकीची विधानं केली. रिट पिटिशन आणि आधीच्या याचिकेत सार्धम्य असल्याचे सांगितले. मात्र, यामध्ये काहीही साम्य



आढळून आलेले नाही. त्यामुळे आम्ही याचिकाकर्त्यांना दंड ठोठावत असल्याचे सुरुवातीला न्यायमूर्तींनी सांगितले. आज सकाळी ही याचिका इतर प्रलंबित याचिकांसारखीच असल्याचे नमूद करण्यात आले होते. मात्र, सुनावणीसाठी याचिका पुकारण्यात आल्यानंतर ऑनलाईन उपस्थित असलेले असीम सरोदे यांनी सांगितले की ही याचिका तत्सम नसून निवडणुकीशी संबंधित आहे. यामुळे मुख्य न्यायाधीश श्री. चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम ए. अंखड यांच्या खंडपीठाने नाराजी व्यक्त केली. खंडपीठाने म्हटले, ही याचिका इतर याचिकांसारखीच असल्याचे चुकीचे विधान केल्याबद्दल आम्ही तुमच्यावर दंड लावणार आहोत आणि याचिका फेटाळणार आहोत, असे हायकोर्टाकडून सांगण्यात आले होते. आता सांगा, तुम्ही चुकीचे विधान का केले? एखाद्या पक्षकारासाठी अशी चुकीची माहिती देण्यामागे तुमची घाई किंवा भीती काय होती?, असा सवालही न्यायालयाने याचिकाकर्त्यांना विचारला. शेवटी न्यायालयाने दंड न आकारता ही याचिका फेटाळून लावली.




# हिंद दी चादर : एकात्मतेची रेशमी वीण अन् संस्कृतीची ऊब

नमस्कार..! पु.ल. देशपांडे एका ठिकाणी म्हणतात, "माणसं जोडणं हाच खरा धर्म आणि ती टिकवणं हीच खरी संस्कृती." आपण जेव्हा 'हिंद दी चादर' म्हणतो, तेव्हा ती केवळ एक कापडाची उपमा नसते, तर ती कोट्यवधी हृदयांच्या स्पंदनांनी विणलेली एक संरक्षक कवच असते. कडाक्याच्या थंडीत जशी एखादी मायेची शाल आपल्याला ऊब देते, तशीच ही भारतीय संस्कृती विविधतेच्या वादळात आपल्याला आजही एकत्र धरून आहे.

माझे मित्र ठाणे जिल्हा माहिती अधिकारी मनोज सुमन शिवाजी सानप साहेब यांच्याशी चर्चा करताना एक विषय निघाला, ते म्हणाले, "कट्टी सर, आपली संस्कृती म्हणजे केवळ सण-उत्सव नाहीत, तर ते जगण्याचं एक शास्त्र आहे. जेव्हा आपण वेशभूषा, खाद्यपदार्थ किंवा व्यापार बघतो, तेव्हा त्यात आपल्याला एकमेकांबद्दलची आदरभावना दिसते." हीच भावना घेऊन आपण या चादरीचे विविध पदर उलगडणार आहोत.

**1. वेशभूषाः अस्मितेचे रंग..**

आपल्या वेशभूषेवरून आपली ओळख ठरते, पण भारतीय वेशभूषा ही 'अनेकता में एकता'चे उत्तम उदाहरण आहे. पंजाबातील शीख बांधवांची डौलदार दस्तार (पगडी), काश्मीरमधील पंडितांचा उबदार फेरण, महाराष्ट्रातील वारकऱ्यांचे पांढरेशुभ्र धोतर आणि उपरणं, आणि सिंधी बांधवांची वैशिष्ट्यपूर्ण टोपी—हे केवळ पेहराव नाहीत.

"पगडी ही केवळ डोक्यावरचं ओझं नाही, तर ती जबाबदारीची जाणीव आहे. जो पगडी घालतो, तो अन्यायाविरुद्ध उभा राहण्यासाठी बांधील असतो." वेशभूषा आपल्याला शिस्त आणि मर्यादा शिकवते. रंगांची ही उधळण जेव्हा एकत्र येते, तेव्हाच 'हिंद दी चादर' खऱ्या अर्थाने रंगीत आणि देखणी दिसते.

**2. खाद्य संस्कृतीः चवीतला ओलावा..**

वेशभूषेच्या रंगांनंतर आपली नजर वळते ती तृप्त करणाऱ्या अन्नाकडे. अन्नाला आपण 'पूर्णब्रह्म' मानतो. अमृतसरच्या सुवर्ण मंदिरात मिळणारा 'कडा प्रसाद' असो, काश्मीरमधील सुगंधी 'कावा' असो, किंवा पंढरपूरच्या वारीतली 'पिठलं-भाकरी'-या प्रत्येक चवीत एक 'सामाईक' ओलावा आहे. तो




म्हणजे 'लंगर'ची संकल्पना.

"खाद्य संस्कृती ही माणसाला माणसाशी जोडते. जेव्हा आपण एका पंगतीत बसून जेवतो, तेव्हा जात, पात आणि धर्म गळून पडतात. केवळ तृप्ती उरते." ही सामाईक पंगतच भारताची खरी ताकद आहे. जिथे अन्नाचा प्रत्येक घास 'सर्वांच्या भल्यासाठी' (सरबत दा भला) या भावनेतून दिला जातो, तिथे संस्कृतीची वीण अधिक घट्ट होते.

**3. व्यापारः विश्वासाचा पाया..**

जिथे पोटाची भूक भागते, तिथे प्रगतीची स्वप्नेही फुलतात. भारताचा व्यापार हा केवळ नफ्यावर आधारित नाही, तो 'विश्वासावर' उभा आहे. सिंधी बांधवांनी फाळणीनंतर शून्यातून विश्व उभं केलं, बंजारा आणि लबाना समुदायांनी तांड्यांच्या माध्यमातून प्राचीन काळी मालवाहतुकीची धुरा सांभाळली.

व्यापारात 'जुबान' महत्त्वाची असते. एकदा शब्द दिला की तो पाळायचा, हा संस्कार आपल्याला या समुदायांनी दिला.

"व्यापार हा केवळ आर्थिक व्यवहार नसून तो संस्कृतीचा प्रवास आहे. एका प्रांतातला माल जेव्हा दुसऱ्या प्रांतात जातो, तेव्हा त्यासोबत तिथले विचारही प्रवासाला निघतात." हा व्यापारच आपल्याला एकमेकांवर अवलंबून राहायला शिकवतो आणि याच 'परस्पर स्वावलंबना'तून देशाची एकता टिकून राहते.

**4. शैक्षणिक आणि साहित्यिक प्रगतीः विचारांचे तेज..**

व्यापारातून लक्ष्मी येते, तर साहित्यातून सरस्वती नांदते. आपल्या संस्कृतीचा कणा आहे आपले साहित्य. काश्मिरी पंडितांनी जपलेली संस्कृतची परंपरा असो किंवा संत नामदेव महाराजांनी पंजाबमध्ये पोहोचवलेली 'अभंगवाणी'-साहित्याने कधीच भौगोलिक सीमा मानल्या नाहीत.

आपली गुरुद्वारे ही केवळ प्रार्थनास्थळे नसून ती शिक्षणाची केंद्रेही आहेत. तिथे इतिहासाचे धडे दिले जातात, स्वसंरक्षणाचे धडे दिले जातात आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे 'मानवतेचा' धडा दिला जातो. "जेव्हा आपण एकमेकांचं साहित्य वाचतो, तेव्हा आपल्याला कळतं की, प्रत्येकाचं दुःख आणि आनंद सारखाच आहे." साहित्यिक प्रगती हीच समाजाची खरी वैचारिक प्रगती असते.

**5. गुरुद्वाराः मानवतेचं माहेरघर**

या सर्व धाग्यांना एकत्र गुंफणारं पवित्र स्थान म्हणजे गुरुद्वारा. गुरुद्वाराच्या चारही दिशांना उघडणारी चार प्रवेशद्वारे हेच सांगतात की, "येथे कोणालाही मज्जाव नाही." जेव्हा दिल्लीत गुरु तेग बहादूरजींनी बलिदान दिलं, तेव्हा त्यांनी केवळ एका धर्माचं रक्षण केलं नाही, तर मानवाच्या श्रद्धेच्या अधिकाराचं रक्षण केलं.

आजही जेव्हा देशावर संकट येतं, तेव्हा गुरुद्वारे सर्वात आधी मदतीचा हात पुढे करतात. हाच तो 'चादरी'चा सर्वात मजबूत कोपरा आहे. सानप साहेब अभिमानाने म्हणतात, "कट्टी सर, गुरुद्वारात मिळणारी शांतता ही जगात कुठेच मिळत नाही, कारण तिथे सेवा हाच परमेश्वर मानला जातो." आपणच आहोत ती चादर!

अखेर ही 'हिंद दी चादर' म्हणजे दुसरं तिसरं काही नसून आपण भारतीय नागरिकच आहोत.

जेव्हा आपण एकमेकांच्या वेशभूषेचा आदर करतो... जेव्हा आपण दुसऱ्याच्या खाद्य संस्कृतीचा आनंद घेतो...

जेव्हा आपण व्यापारात प्रामाणिकपणा जपतो...

आणि जेव्हा आपण साहित्यातून एकमेकांचे विचार समजून घेतो...

...तेव्हाच ही चादर अधिक मजबूत होते.

"आपल्याला फाटलेली चादर शिवण्यापेक्षा, ती कधीच फाटू नये याची काळजी घेणारे 'दोरे' बनायचं आहे."

प्रवास संपला नाही, तर तो "हिंद दी चादर" श्री गुरु तेग बहादूर साहिब यांच्या 350 व्या शहिदी समागम या कार्यक्रमाच्या माध्यमातून आणि आपल्या आचरणातून आता खऱ्या अर्थाने सुरू झाला आहे...!

**लेखक**
**विजयकुमार कट्टी**
**पर्यावरण संरक्षक व मार्गदर्शक,ठाणे**
**(संपर्क : 7977513822 )**

# एमपॉवर युथोपियाचा विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाखालील भव्य मूड परेडद्वारे जागतिक विक्रम

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टचा उपक्रम असलेल्या एमपॉवरच्या 'एमपॉवर युथोपिया' या युवा मानसिक आरोग्य महोत्सवाला जागतिक विक्रमाचे अधिकृत प्रमाणपत्र मिळाले आहे. कल्याणमधील बीके बिर्ला कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाखालील सर्वात मोठ्या मूड परेडचे आयोजन केल्याबद्दल वर्ल्ड रेकॉर्ड असोसिएशनकडून (ओडब्ल्यूआरए) ही मान्यता मिळाली आहे. या महाविद्यालयाच्या बिर्लोत्सव या आंतरमहाविद्यालयीन युवा महोत्सवाचा भाग म्हणून आयोजित केलेल्या या मूड परेडमध्ये ८ ते २० वर्षे वयोगटातील ९०० हून अधिक विद्यार्थी एकत्र आले होते. त्यांनी एकत्रितपणे १२ विशिष्ट भावना व्यक्त केल्या. भावनिक अभिव्यक्तीला सामान्य स्वरूप देणे आणि तरुणांमध्ये मानसिक आरोग्याभोवती मुक्त संवादाला प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा उद्देश होता.

या दोन दिवसांच्या महोत्सवात मुंबई आणि शेजारच्या भागांतील ५० हून अधिक महाविद्यालयांचे ७,००० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यांनी तरुणांच्या मानसिक आरोग्यावर लक्ष केंद्रित करणाऱ्या जागरूक आधारित अनेक उपक्रमांमध्ये सहभाग घेतला.

या कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांमध्ये केलेल्या एका प्रत्यक्ष सर्वेक्षणातून असे दिसून आले की ५५ टक्के विद्यार्थी मित्रांकडून भावनिक आधार घेतात, २५ टक्के कुटुंबाकडून, तर १५ टक्के अजिबात आधार घेत नाहीत. केवळ ५ टक्के विद्यार्थी मानसशास्त्रज्ञ किंवा शिक्षकांशी संपर्क साधतात, यातून औपचारिक मानसिक आरोग्य सेवांशी मर्यादित सहभाग दिसून येतो. यामध्ये शैक्षणिक दबाव ही सर्वात मोठी समस्या (३० टक्के) म्हणून पुढे आली, त्यानंतर नातेसंबंधांचे प्रश्न (२५ टक्के), करिअरची काळजी (२० टक्के), चिंता किंवा अतिविचार (२० टक्के) आणि शारीरिक प्रतिमा आणि सामाजिक छळ (५ टक्के) समोर आल्या.

या उपक्रमाबद्दल भाष्य करताना, एमपॉवर आणि आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टच्या संस्थापक श्रीमती नीरजा बिर्ला म्हणाल्या, "तरुण जेथे कुठे असतील- कॉलेज कॅम्पसमध्ये असो किंवा त्यांच्या दैनंदिन जीवनात असो- तेथे मानसिक आरोग्याचे साहाय्य पोहोचले पाहिजे- एमपॉवर युथोपिया सारख्या उपक्रमांमध्ये जागरूकता, प्रवेश आणि समवयस्कांचा सहभाग एकत्र होतो. त्यातून विद्यार्थी निर्भयतेने आधार मिळविण्यास आणि कल्याणाच्या संस्कृतीत सक्रियपणे योगदान देण्यास सक्षम होतात. ही भारताच्या भविष्यातील भावनिक लवचिकतेमध्ये गुंतवणूक आहे."

भारतातील ७ टक्क्यांपेक्षा अधिक किशोरवयीन मुले मानसिक आरोग्याच्या आव्हानांना तोंड देत असताना, एमपॉवर देशभरातील सुश्रुषेचा अभाव भरून काढण्यासाठी कॅम्पस-आधारित उपक्रमांना बळकटी देत आहे.

# कल्याणमध्ये स्वामी विवेकानंद जयंती साजरी



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** पारनाका मित्र मंडळ,जनता सहकारी बँक कर्मचारी संघ, कल्याण तसेच अधिकारी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी प्रमाणे पारनाका,कल्याण येथील स्वामींच्या पुतळयास अभिवादन करून स्वामी विवेकानंद यांची १६३ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस इंद्रकुमार मिस्त्री,कल्याण जनता बँकेचे ज्येष्ठ संचालक अँड. सुरेश पटवर्धन, डॉ.रत्नाकर फाटक, पारनाका मित्र मंडळाचे अध्यक्ष संदिप पळणीटकर यांनी स्वामींच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर छत्रपती प्रभात शाखेचे ज्येष्ठ स्वयंसेवक जोशी यांनी स्वामी विवेकानंदा वर केलेले पद्य सुंदर रित्या सादर केले व लोकांकडून म्हणून घेतले.

आजचा दिवस हा संपूर्ण भारतात राष्ट्रीय युवादिन म्हणून साजरा करण्यात येतो त्या अनुषंगाने पारनाका परिसरातील युवक युवतींनी उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे त्यांचे पुष्पगुच्छ देऊन कौतुक करण्यात आले. त्यामध्ये अमृता जोशी यांनी ज्योतिष शास्त्राची पदवी संपादन केले असून त्या प्रवचन,कीर्तन पण करतात म्हणून कौतुक करण्यात आले. त्यानंतर भार्गव जोशी यांनी आळंदी येथे वेद पाठ शाळेत ५ वर्षे धार्मिक शिक्षण घेतले त्याबद्दल,तसेच निनाद पाठक हा बुद्धिबळ खेळत तरबेज असून शालेय जीवनापासून राज्य स्तरीय स्पर्धा जिंकल्या असून आता देशांतर्गत बुद्धिबळ स्पर्धेत सहभागी होतो. तसेच वंदे मातरम गीतास १५० वर्षे झाली असून अनुष्का गांगल ही संपूर्ण वंदेमातरम् सादर करते म्हणून, तसेच सुश्रुत कुळकर्णी यास आय. इ, एस. संस्कृत केंद्र तथा मुंबई विद्यापीठ संस्कृत विभाग तर्फे संस्कृत कथा कथन स्पर्धेत प्रथम क्रमांक आणि स्वामी विवेकानंद यांच्या १६४ व्या जन्म वर्षाबद्दल रामकृष्ण मिशन मुंबई तर्फे घेण्यात आलेल्या श्लोक पाठांतर स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळाला म्हणून कौतुक करण्यात आले.त्यानंतर मिलिंद रेडे यांनी जोशी यांचे स्वामी विवेकानंदांचे उत्तम रित्या पद्य दरवर्षीप्रमाणे सादर केले त्याबद्दल फुल देऊन सत्कार केला. छत्रपती प्रभात शाखेचे स्वयंसेवक दर वर्षी मोठ्या संख्येने कार्यक्रमात सहभागी होत असतात त्यांचे आभार मानले. प्रमुख वक्ते वासुदेव कानिटकर यांनी स्वामीं बद्दल विचार मांडले. कल्याण जनता सहकारी बँकेचे संचालक माननीय सुरेश पटवर्धन, डॉक्टर रत्नाकर पाठक, बँकेचे सीईओ अनंत कुलकर्णी यांनी स्वामी विवेकानंद बद्दल विचार मांडले.संदिप पळणीटकर यांनी सूत्रसंचालन केले व सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमास साधारण ५० ते ६० जण उपस्थित होते.

# मंगळवेढा दुहेरी खून खटल्यातील आरोपीस जामीन मंजूर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पंढरपूर :** मंगळवेढा येथील शनिवार पेठ येथे घडलेल्या खून खटल्यातील आरोपी विमल अंबादास पाटील हीस पंढरपूर येथील. मे. जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री.ओंकार देशमुख यांचे कोर्टाकडून नियमित जामीन मंजूर झाला आहे. यात हकीकत अशी की, शनिवार पेठ, मंगळवेढा येथील आरती रामचंद्र चौगुले हीचा 2019 साली देगावं तालुका मंगळवेढा येथील अमोल अंबादास पाटील यांचेशी विवाह झालेला होता. यातील अमोल हा लग्नापूर्वी पुणे येथे नोकरीस होता. परंतु लग्नानंतर काही दिवसांनी पत्नीसह गावाकडे येवून राहिला. त्यानंतर काही दिवसांनी आरती ही प्रसुतीसाठी आपल्या माहेरी गेलेली होती. प्रसुतीनंतर अमोल हा आरतीला आपल्या घरी घेवून जाण्यासाठी आपल्या आई - वडीलांसोबत आरतीचे घरी दि.27/5/25 रोजी गेला, परंतु आरती व तिचे आई व भाऊ यांनी तिला सासरी पाठविणेस नकार दिला व आरती म्हणाली की, मला अमोल हा पैशासाठी त्रास देत आहे व काही कामधंदा करीत नाही, म्हणून मला नांदावयाचे नाही. मी मंगळवेढा कोर्टात पोटगीसाठी व घटस्फोटासाठी केस दाखल केली आहे. याचे रुपांतर वादात होवून



अमोलची आई विमल हिने आरती हीस पकडून ठेवले व अमोलने आरतीचे पाठीत व पोटात चाकू खुपसल्याने आरतीचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याची फिर्याद आरतीची आई- सोनाली रामचंद्र चौगुले हिने मंगळवेढा पोलीसात दाखल केलेली आहे. सदर मारहाणीत आरतीची आई व भाऊ हे देखील जखमी असल्याचे तक्रारीत नमुद आहे. सदर वाद सुरु असताना आरतीचा भाऊ प्रसाद व आई सोनाली यांनी अमोलचे वडील अंबादास पाटील यांचे तोंडावर व डोक्यात विटा घातल्याने ते रक्तबंबाळ होवून जागीच पडून राहिले. त्यानंतर अंबादास यांना उपचारासाठी सोलापूर येथील हॉस्पीटल येथे दाखल केले असता त्यांचा उपचाऱ्यादरम्यान मृत्यू झाला. त्याची फिर्याद ही मंगळवेढा पोलीस स्टेशन येथे दाखल झालेली आहे. सदर गुन्हयांमधील प्रती केसेस पंढरपूर येथील मे.जिल्हा व सत्र न्यायालयात प्रलंबित आहेत. सदर सेशन केस नं.97/2025 मधील आरोपी नामे विमल अंबादास पाटील हीचे वतीने जामीन अर्ज मे.कोर्टात दाखल केलेला होता. सदर जामीन अर्जाचे अनुषंगाने आरोपीचे वकीलांचा व सरकारी पक्षाचा युक्तीवाद झाला. आरोपीचे वकिलांनी कायदेशीर मुद्यांचा आधार घेत युक्तीवाद केला की, आरोपी विमल ही तिचे जखमी पती अंबादास यांना वाचविणेचा प्रयत्न करीत होती, तिने कोणताही गुन्हा केलेला नाही. असा आरोपींच्या वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरत सदर जामीन अर्ज पंढरपूर येथील मे. जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री.ओंकार देशमुख यांचे कोर्टाने दि.09 जानेवारी रोजी मंजुर केला आहे.

आरोपीचे वतीने अॅड. शिवराज पाटील, अॅड.विशाल शंकर कदम, अॅड. संगम मोरे यांनी काम पाहिले व सरकारपक्षातर्फे सरकारी वकील श्री.सारंग वांगीकर यांनी काम पाहिले.

# शिवसेना ठाकरे गटाच्या उमेदवाराचा एआय-निर्मित बनावट व्हिडिओ व्हायरल

**दै.ठाणेजीवनदीपवार्ता**

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या निवडणूक प्रचारादरम्यान अत्यंत गंभीर प्रकार समोर आला आहे. कल्याण येथील पॅनेल क्रमांक ६ ड मधील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार संकेश भोईर. यांचा एआय तंत्रज्ञानाच्या माध्यमातून बनवलेला बनावट व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आला आहे. या



व्हिडिओमध्ये संकेश भोईर. यांच्यावर हत्येचा गुन्हा, खंडणीसारखे गंभीर आरोप दाखवण्यात आले असून हे सर्व आरोप पूर्णपणे खोटे आणि दिशाभूल करणारे असल्याचा दावा भोईर यांनी केला आहे. माझ्यावर कोणताही गुन्हा दाखल नसताना जाणीवपूर्वक प्रतिमा मलिन करण्यासाठी विरोधकांनी हा डाव आखल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

दरम्यान हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर यावर भोईर यांनी आक्षेप घेतला आहे. सदरचा व्हिडीओ बनावट असून सदरचे आरोप खोटे असल्याचे भोईर यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले आहे. आपल्या विरोधात पोलिसात एकही तक्रार दाखल नसतानाही आपली प्रतिमा मलीन करण्याचा विरोधकांनी डाव आखल्याचा आरोप करत याबाबतचे पुरावे त्यांनी मध्यमासमोर सादर करत याप्रकरणी भोईर यांनी पोलिसात तक्रार दाखल केल्याचे सांगितले.

# नशामुक्त भारत अभियानांतर्गत अंमली पदार्थविरोधी संकल्प

## — जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांचा निर्धार

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** "मी अंमली पदार्थांचा कधीही वापर करणार नाही आणि इतरांनाही त्यापासून दूर राहण्यासाठी प्रेरित करेन." स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात येणाऱ्या 'राष्ट्रीय युवा दिनाचे' औचित्य साधत ठाणे जिल्हा प्रशासनातर्फे नशामुक्त भारत अभियानांतर्गत अंमली पदार्थविरोधी शपथ कार्यक्रम आयोजित करण्यात आला. जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या उपक्रमाला विद्यार्थ्यांसह



शिक्षक व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सर्वांनी अंमली पदार्थांपासून दूर राहण्याची आणि इतरांनाही त्यासाठी प्रेरणा देण्याची प्रतिज्ञा केली.

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, पोलिस उपअधीक्षक (गृह), ठाणे ग्रामीण येथील श्रीमती निलम वाव्हळ, तसेच महाराष्ट्र राज्य नशाबंदी मंडळाचे संघटक श्री. मिलिंद पाटील उपस्थित होते. या अभियानाचा मुख्य हेतू युवक-युवतींमध्ये व्यसनमुक्तीबाबत जागरूकता निर्माण करणे, त्यांना निरोगी व सकारात्मक जीवनशैलीकडे प्रवृत्त करणे आणि अंमली पदार्थांच्या विळख्यातून समाजाची सुटका करणे हा आहे. अंमली पदार्थांचे दुष्परिणाम केवळ व्यक्तीपुरते मर्यादित न राहता कुटुंब, समाज व राष्ट्राच्या प्रगतीत अडथळे निर्माण करतात. सुजाण आणि जबाबदार नागरिक घडविण्याच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

अंमली पदार्थमुक्त भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी तरुणांनी सुजाण निर्णय घेणे आणि जीवनातील आव्हानांना सकारात्मकतेने सामोरे जाणे आवश्यक असल्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. युवकांच्या सक्रिय सहभागामुळे अभियानाला मोठे यश मिळाले.

शाळा, महाविद्यालये, वसतिगृहे, महिला बचत गट, अंगणवाडी सेविका तसेच विविध सामाजिक संस्थांनी सहभाग नोंदवून अभियानाला व्यापक स्वरूप दिले. या यशस्वी उपक्रमातील महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी समाधान व्यक्त केले.

# भविष्यवेध



**गुरुवार**
**१५ जानेवारी २०२६**

**मेष**
तुम्हाला एखाद्या गोष्टीबद्दल गोंधळ वाटत असेल, परंतु ती गोष्ट कोणाशी तरी शेअर केल्याने सर्व काही स्पष्ट होईल. तुम्ही व्यवसायासाठी नवीन योजना बनवाल.

**वृषभ**
घरी धार्मिक कार्यक्रमात सहभागी होण्याचा विचार कराल. लोकांना खूश करण्यासाठी तुमच्या व्यक्तिमत्त्वात काही बदल करावे लागतील.

**मिथुन**
राजकारणात सक्रिय भूमिका बजावाल, ज्यामुळे तुमची प्रशंसा होईल. प्रवास केल्यामुळे तुम्हाला थकवा जाणवू शकतो. चित्रकारांना हा दिवस अनुकूल वाटेल.

**कर्क**
तुम्ही तुमच्या जोडीदारासोबत घरगुती वस्तू खरेदी करण्याची योजना आखाल. आज तुम्हाला नोकरीच्या चांगल्या संधी चालून येतील.

**सिंह**
आज, तुमची मनातील शक्ती कामाच्या ठिकाणी तुमचा दिवस सुधारण्यास मदत करेल. तुमच्या जोडीदाराच्या आयुष्यात होणारे बदल आनंद आणतील.

**कन्या**
नोकरीच्या चांगल्या संधी मिळतील. एखादे काम पूर्ण करण्यासाठी तुम्ही कुटुंबातील सदस्यांचा सल्ला घेऊ शकता. घरात आनंददायी वातावरण राहील.

**तुळ**
आज नवीन व्यवसायात पैसे गुंतवल्याने तुमचा नफा दुप्पट होऊ शकतो. रिअल इस्टेटशी संबंधित समस्या सोडवल्या जातील. मन खुश होईल.

**वृश्चिक**
विद्यार्थ्यांसाठी हा दिवस खूप चांगला असेल; थोडे अधिक परिश्रम केल्यास लवकरच यश मिळेल. वरिष्ठांशी बोलून मार्गदर्शन घ्या.

**धनु**
कोणत्याही गोष्टीवर रागावणे टाळणे चांगले. मालमत्तेत गुंतवणूक करण्यासाठी आजचा दिवस शुभ आहे. नीट विचाराने निर्णय घेऊन पैसे गुंतवा.

**मकर**
नोकरी शोधणाऱ्यांसाठी मोठ्या कंपनीकडून नोकरीच्या संधी उपलब्ध होतील. दैनंदिन दिनचर्येत सकारात्मक बदल केल्याने लूक नक्कीच वाढेल.

**कुंभ**
तुम्हाला तुमचे ध्येय साध्य करण्यास मदत करतील. लोकांचे मत आज फायदेशीर ठरेल. तुमची आर्थिक परिस्थिती पूर्वीपेक्षा खूपच चांगली असेल.

**मीन**
आज नवीन मित्र बनवण्यापूर्वी, त्यांच्याबद्दल संपूर्ण माहिती गोळा करा आणि नंतर मैत्रीचा हात पुढे करा. कोणावरही विश्वास ठेवू नका.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://www.facebook.com/jeevandeepnews/
https://www.instagram.com/thane_jeevandeep/
https://x.com/Jeevandeepvarta
https://jeevandeepvarta.com/






# मतदानाच्या पूर्वसंध्येला सोशल मीडियावरील बदनामीविरोधात ठाकरे गटाचे उमेदवार संकेश भोईर आक्रमक



**कल्याण-डोंबिवली महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उबाठा गटाचे उमेदवार संकेश भोईर यांनी त्यांच्या विरोधात सोशल मीडियावर सुरू असलेल्या खोट्या व बदनामीकारक प्रचारावर तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. "पायाखालची वाळू सरकलेल्यानेच सोशल मीडियावर बदनामी केली जाते," असे म्हणत त्यांनी विरोधकांवर थेट आरोप केला. आपल्याविरोधात साधी एकही एनसी किंवा गुन्हा नोंद नसल्याचे स्पष्ट करत, पोलिसांकडून मिळालेले "कोणताही गुन्हा नोंद नसल्याबाबतचे" पोलीस व्हेरिफिकेशन प्रमाणपत्रही त्यांनी प्रसिद्धीमाध्यमांसमोर सादर केले. पराभवाची भीती वाटू लागल्यानेच काहीजण फेक पोस्ट्स आणि बनावट आयडींच्या माध्यमातून मतदारांची दिशाभूल करत असल्याचा दावा भोईर यांनी केला. "सत्य माझ्या बाजूने आहे; ही बदनामी म्हणजे विरोधकांची हतबलता आहे," असे ठामपणे सांगत अशा खोट्या प्रचाराविरोधात कडक कारवाईची मागणीही त्यांनी प्रशासनाकडे केली आहे.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून कल्याण-डोंबिवली महापालिकेची निवडणूक लढविणारे उमेदवार संकेश भोईर यांनी त्यांच्या विरोधात सोशल मीडियावर खोटी व बदनामीकारक माहिती पसरवून मतदारांची दिशाभूल केली जात असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकाराबाबत संकेश भोईर यांनी संबंधितांविरोधात रितसर तक्रार दाखल केली आहे. निवडणूक प्रचाराच्या पार्श्वभूमीवर काही अज्ञात व्यक्ती सोशल मीडिया व इतर पेजमार्फत जाणूनबुजून खोटी माहिती प्रसारित करत असून, त्याचा थेट परिणाम त्यांच्या प्रतिमेवर तसेच निवडणूक प्रक्रियेवर होत असल्याचे भोईर यांनी सांगितले. ही माहिती पूर्णपणे निराधार असून, बनावट (फेक) आयडींचा वापर करून समाजात संभ्रम निर्माण करण्याचा हा प्रयत्न असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या प्रकरणात आपण कोणत्याही गुन्ह्यात दोषी नसल्याचे स्पष्ट करत संकेश भोईर यांनी पोलिसांकडून मिळालेले "कोणताही गुन्हा नोंद नसल्याचे" पोलीस व्हेरिफिकेशन प्रमाणपत्र मीडियासमोर सादर केले. खोटी माहिती पसरवून आपली प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांविरोधात कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी प्रशासनाकडे केली आहे.

दरम्यान, सोशल मीडियावरील अफवा व अपप्रचारामुळे लोकशाही प्रक्रियेवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे मतदारांनी कोणत्याही अप्रामाणिक माहितीवर विश्वास न ठेवता सत्याची खातरजमा करावी, असे आवाहन संकेश भोईर यांनी केले आहे.

# निवडणूक ड्युटीचा भार सार्वजनिक वाहतुकीवर; बससेवेवर मोठा परिणाम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** मुंबई महापालिकेसह मुंबई-ठाणे परिसरातील महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रशासनाने सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील बसगाड्यांचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्याचा निर्णय घेतला आहे. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी सार्वजनिक परिवहन उपक्रमांच्या बसेस ईव्हीएम, मतदान साहित्य तसेच निवडणूक अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वाहतुकीसाठी ताब्यात घेण्यात येणार आहेत. या निर्णयाचा थेट परिणाम मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली आणि नवी मुंबईतील नियमित प्रवासी बससेवेवर होण्याची शक्यता आहे.

निवडणूक प्रशासनाच्या नियोजनानुसार बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन (BEST), कल्याण-डोंबिवली परिवहन महामंडळ (KDMT), नवी मुंबई महानगर परिवहन (NMMT) आणि ठाणे महानगर परिवहन (TMT) या चारही प्रमुख सार्वजनिक वाहतूक सेवांतील बसेस निवडणूक ड्युटीसाठी वापरल्या जाणार आहेत. १३ ते १६ जानेवारी या कालावधीत या बसेस निवडणूक कामात गुंतल्याने नियमित फेऱ्यांमध्ये कपात होणार आहे.

**■ प्रवाशांची गैरसोय होणार?**

या निर्णयामुळे रोज कार्यालयात जाणारे नोकरदार, विद्यार्थी, कामगार तसेच ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागू शकतो. बसफेऱ्या कमी झाल्यास थांब्यांवर प्रवाशांची गर्दी वाढणार असून, सकाळी व सायंकाळी 'पीक अवर्स'मध्ये उशिरा पोहोचणे, बस न मिळणे किंवा गर्दीतून प्रवास करणे अशी स्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. विशेषतः रेल्वेसेवेत आधीच गर्दी असलेल्या मार्गांवर बस हा पर्याय असतो; मात्र बसेस कमी झाल्यास रेल्वेवरील ताणही वाढू शकतो.

**■ सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवरील ताण**

निवडणूक काळात मोठ्या प्रमाणावर बसेस ताब्यात घेतल्याने सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची लवचिकता कमी होते. अचानक वाढणारी प्रवासी संख्या आणि मर्यादित बसफेऱ्या यामुळे वेळापत्रक कोलमडण्याचा धोका असतो. चालकांची उपलब्धता, बस डेपोचे नियोजन आणि पर्यायी फेऱ्यांची व्यवस्था करणे हे परिवहन उपक्रमांसमोर मोठे आव्हान ठरणार आहे. काही मार्गांवर बससेवा पूर्णतः किंवा अंशतः बंद ठेवावी लागण्याचीही शक्यता व्यक्त केली जात आहे.

**■ प्रशासनाची भूमिका**

निवडणूक प्रशासनाकडून मात्र ही तात्पुरती व्यवस्था असल्याचे सांगण्यात आले आहे. निवडणूक प्रक्रिया पूर्ण होताच सर्व बसेस तातडीने त्यांच्या संबंधित परिवहन उपक्रमांकडे परत दिल्या जाणार असून, त्यानंतर नियमित बससेवा पूर्ववत करण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. तरीही या कालावधीत प्रवाशांनी पर्यायी प्रवासाच्या साधनांचा विचार करावा, तसेच कार्यालयीन वेळा लवचिक ठेवण्याची गरज असल्याचे मत प्रवासी संघटनांकडून व्यक्त केले जात आहे.

महापालिका निवडणुकांसाठी ही व्यवस्था अपरिहार्य असली, तरी त्याचा सर्वाधिक फटका सर्वसामान्य प्रवाशांनाच बसणार असल्याचे चित्र सध्या स्पष्टपणे दिसून येत आहे.

# मतदार ओळखपत्र नसेल; तर मतदानाचा हक्क कसा बजावायचा?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

राज्यातील २९ महानगरपालिकेच्या निवडणुकांसाठी आज मतदान होणार असून, लाखो मतदार मतदानासाठी सज्ज झाले आहेत. मात्र, मतदान केंद्रावर मतदानाचा अधिकार बजावण्यासाठी मतदार यादीत नाव असणे आणि वैध फोटो ओळखपत्र सोबत असणे आवश्यक आहे. अनेक नागरिकांमध्ये नेमके कोणते ओळखपत्र मतदानासाठी ग्राह्य धरले जातात, याबाबत संभ्रम आहे. याशिवाय, अनेक वेळा मतदारांकडे मतदार ओळखपत्र (Voter ID) नसते किंवा ते गहाळ झालेले असते. अशा वेळी मतदान करता येईल की नाही, असा प्रश्न अनेकांना पडतो. त्यामुळेच, बीएमसी निवडणुकीसाठी मतदान करताना कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत, याची सविस्तर माहिती जाणून घेऊया.

**■ पर्यायी कागदपत्रे ग्राह्य**

निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, मतदारांकडे निवडणूक आयोगाने दिलेले मतदार ओळखपत्र नसेल, तर ओळख पटवण्यासाठी पर्यायी कागदपत्रे ग्राह्य धरली जातात. या यादीत आधार कार्डसह इतर अधिकृत कागदपत्रांचा समावेश आहे. यापैकी कोणतेही एक वैध ओळखपत्र दाखवून तुम्ही मतदान करू शकता. मतदानासाठी मतदार मान्यताप्राप्त फोटो ओळखपत्र घेऊन येऊ शकतात.

- पासपोर्ट
- आधार कार्ड
- ड्रायव्हिंग लायसन्स
- पॅन कार्ड

**■ केंद्र/राज्य सरकार, पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी जारी केलेली फोटोयुक्त सेवा ओळखपत्रे**

- बँक/पोस्ट ऑफिस पासबुक
- एनपीआर अंतर्गत RGI ने जारी केलेले स्मार्ट कार्ड
- मनरेगा जॉब कार्ड
- कामगार मंत्रालयाच्या हेल्थ इन्शुरन्स स्मार्ट कार्ड
- पेन्शनकार्ड
- दिव्यांग (अपंगत्वाचा) दाखला

## तुकारामनगर राडा प्रकरणी
# शिंदे गटाचे उमेदवार नितीन पाटील व रवी पाटील अटकेत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तुकारामनगर येथे झालेल्या रक्तरंजित संघर्ष प्रकरणी रामनगर पोलिसांनी शिवसेना (शिंदे) गटाचे उमेदवार नितीन पाटील आणि रवी पाटील यांना अटक केली आहे. अटक झालेले दोघेही भाऊ असून ते पॅनल क्रमांक २९ मधून निवडणूक लढवत आहेत.

सोमवारी रात्री उशिरा तुकारामनगर परिसरात शिवसेना (शिंदे) आणि भाजप कार्यकर्त्यांमध्ये जोरदार हाणामारी झाली होती. या हिंसक घटनेत पॅनल क्रमांक २९ (ब) मधील भाजप उमेदवार आर्या नाटेकर यांचे पती ओमनाथ नाटेकर यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला होता. या प्रकरणी पोलिसांनी हत्येच्या प्रयत्नासह गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करत एकूण आठ जणांविरोधात गुन्हा नोंदवला असून पाच जणांना अटक करण्यात आली आहे.

या घटनेनंतर पाटील बंधूंना अटक करण्याची जोरदार मागणी होत होती. मंगळवारी संध्याकाळी त्यांचा रक्तदाब वाढल्याने त्यांना डोंबिवलीतील स्पर्श रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र रात्री उशिरा पोलिसांनी रुग्णालयात पोहोचून त्यांना ताब्यात घेतले. शास्त्रीनगर रुग्णालयात वैद्यकीय तपासणी केल्यानंतर रामनगर पोलिसांनी त्यांना अधिकृतरीत्या अटक केली.

पाटील बंधू हे ओमनाथ नाटेकर यांच्यावरील खुनी हल्ल्याच्या प्रकरणातील मुख्य आरोपी असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे. त्यांच्या अटकेनंतर रामनगर पोलिस ठाण्याबाहेर रात्री उशिरापर्यंत राजकीय नाट्य रंगले. शिवसेनेचे आमदार राजेश मोरे यांनी या अटकेचा निषेध करत पोलिसांवर पक्षपातीपणा आणि हुकूमशाही कारवाईचे आरोप केले.

दरम्यान, पाटील बंधूंच्या अटकेनंतर तुकारामनगर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी अतिरिक्त बंदोबस्त तैनात केला आहे. या प्रकरणामुळे निवडणूक प्रचाराच्या अंतिम टप्प्यात राजकीय वातावरण अधिकच तापले आहे.

# उरण कॉरिडॉरवर प्रवासीसंख्येत झपाट्याने वाढ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मध्य रेल्वेच्या नेरूळ-सीबीडी बेलापूर-उरण कॉरिडॉर रेल्वे मार्गावर प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाल्याचे चित्र समोर आले आहे. सुरुवातीच्या काळात मोजकेच प्रवासी वापरत असलेल्या या मार्गावर आता नियमित प्रवास करणाऱ्यांची संख्या तब्बल २४ लाखांवर पोहोचली आहे. नोकरदार, चाकरमानी आणि विद्यार्थ्यांचा या मार्गावर मोठ्या प्रमाणात वापर वाढला असून उरण कॉरिडॉर मध्य रेल्वेच्या महत्त्वाच्या उपनगरी मार्गांपैकी एक ठरत आहे.

मध्य रेल्वे प्रशासनाने १२ जानेवारी २०२४ रोजी उरण कॉरिडॉर रेल्वे मार्गाचे उद्घाटन करून तो प्रवाशांसाठी खुला केला होता. उरण परिसरातील मोठे औद्योगिक क्षेत्र, बंदराशी संबंधित उद्योग तसेच वाढते नागरीकरण लक्षात घेता नेरूळ व सीबीडी बेलापूर येथून उरणकडे प्रवास करणाऱ्या चाकरमान्यांसाठी हा मार्ग अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे.

सुरुवातीच्या काही महिन्यांत प्रवाशांचा प्रतिसाद मर्यादित असला, तरी कालांतराने या मार्गावरील प्रवासात सातत्याने वाढ होत गेली. प्रवासीसंख्या वाढत असल्याचे लक्षात आल्यानंतर मध्य रेल्वेने २०२४ च्या अखेरीस आणि २०२५ दरम्यान उरण कॉरिडॉरवरील लोकल फेऱ्यांची संख्या वाढवली. याआधी या मार्गावर सुमारे ८ ते १० लाख प्रवासी नियमित प्रवास करत होते.

मात्र, अलीकडील आढाव्यानुसार वर्षाच्या सुरुवातीलाच हा आकडा २४ लाखांहून अधिक झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. उरण परिसरातील औद्योगिक विस्तार, रोजगाराच्या संधी आणि सुधारलेली रेल्वे सेवा यामुळे प्रवाशांचा ओघ वाढत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

# कल्याणमध्ये प्रचार रॅलीदरम्यान झेंडा उच्चदाब वाहिनीला लागताच स्फोट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण : राज्यातील २९ महानगरपालिका निवडणुकांच्या प्रचाराची सांगता मंगळवारी (दि. १३) झाली असली, तरी प्रचाराच्या शेवटच्या दिवशी कल्याण शहरात एक मोठी दुर्घटना थोडक्यात टळली. कल्याणच्या योगिधाम परिसरात महायुतीची प्रचार रॅली सुरू असताना अचानक झालेल्या स्फोटामुळे काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले.**

योगिधाम परिसरातून निघालेल्या महायुतीच्या प्रचार रॅलीदरम्यान एका कार्यकर्त्याच्या हातातील पक्षाचा झेंडा रस्त्याच्या वरून गेलेल्या उच्च-दाबाच्या विद्युत तारेला लागला. झेंडा तारेला लागताच मोठा आवाज होऊन स्फोट झाला. या स्फोटामुळे रॅलीतील कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिकांमध्ये एकच गोंधळ उडाला.

माहितीनुसार, महायुतीचे उमेदवार दया गायकवाड, वनिता पाटील, गणेश कोट आणि अनघा देवळेकर यांच्या प्रचारासाठी ही रॅली काढण्यात आली होती. या घटनेत क्षितिज पाटील नावाचा एक कार्यकर्ता जखमी झाल्याचे सांगितले जात असून त्याला जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मात्र, याबाबत अद्याप अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. दरम्यान, या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'रेडिट'वर शेअर करण्यात आलेल्या व्हिडीओमध्ये, पिक-अप वाहनावर उभे असलेले कार्यकर्ते झेंडे हातात घेऊन प्रचार करत असताना अचानक झेंडा लोंबकळणाऱ्या उच्च-दाबाच्या विजेच्या तारेला लागल्याचे स्पष्टपणे दिसते. झेंडा तारेला लागताच मोठा स्फोट होतो आणि त्यानंतर रॅलीत धावपळ उडते.

या घटनेनंतर शहरातील अनेक भागांमध्ये लोंबकळणाऱ्या विद्युत तारांबाबत नागरिकांनी संताप व्यक्त केला असून, अशा निष्काळजीपणामुळे मोठी दुर्घटना घडू शकते, अशी प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. प्रचाराच्या अखेरच्या दिवशी घडलेल्या या घटनेमुळे प्रशासनाच्या सुरक्षिततेच्या व्यवस्थांवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

# ठाणे महापालिका निवडणुकीसाठी १६.४९ लाख मतदार आज ईव्हीएममध्ये कैद होणार ६४९ उमेदवारांचे भवितव्य

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे महापालिका निवडणुकीसाठी आज गुरुवारी (दि.15) रोजी मतदान होणार असून या निवडणुकीत तब्बल १६ लाख ४९ हजार ८६९ मतदार आपला हक्क बजावणार आहेत. राजकीय पक्षांसह अपक्ष उमेदवार मिळून ६४९ उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएममध्ये बंद होणार आहे. ठाणे महापालिका क्षेत्रात एकूण मतदारांपैकी ८ लाख ६३ हजार ८७८ पुरुष, ७ लाख ८५ हजार ८३० महिला तर १५९ इतर मतदार आहेत. निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी ९ प्रभागांमध्ये ११ निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची कार्यालये कार्यरत आहेत.



या निवडणुकीसाठी सुरुवातीला ११०७ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. छाननी प्रक्रियेत ९९ उमेदवारांचे अर्ज बाद झाले, तर १ आणि २ जानेवारी रोजी अर्ज मागे घेण्याच्या दिवशी २६९ उमेदवारांनी माघार घेतली. त्यामुळे अंतिमतः ६४९ उमेदवार रिंगणात राहिले आहेत. यामध्ये शिवसेना (शिंदे गट) पक्षाचे सात उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. मतदानासाठी ३३ प्रभागांमध्ये २०१३ मतदान केंद्रे स्थापन करण्यात आली असून, त्याठिकाणी १२ हजार ६५० अधिकारी व कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. सुरक्षिततेच्या दृष्टीने ११ विभागांतील ४५ ठिकाणी एकूण ३०५ संवेदनशील व अतिसंवेदनशील ठिकाणे ओळखण्यात आली असून, तेथे ७०१ सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. मतदानाच्या दिवशी मतदारांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी प्रशासनाने आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. मतदान केंद्रांवर स्वयंसेवकांची मदत, दिव्यांगांसाठी व्हीलचेअर, ज्येष्ठ नागरिकांसाठी बसण्याची सोय तसेच पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती महापालिका प्रशासनाने दिली आहे.

लोकशाहीच्या उत्सवासाठी ठाणे सज्ज झाले असून, मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी प्रशासनाकडून आवाहन करण्यात आले आहे.

# 12 जिल्हा परिषद आणि 125 पंचायत समित्यांसाठी 5 फेब्रुवारीला मतदान ■ 7 फेब्रुवारीला मतमोजणी

### – राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांची घोषणा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**राज्यातल्या १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांसाठी ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार असून ७ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होईल, अशी घोषणा राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत केली. यामध्ये पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजी नगर, परभणी, धाराशिव, लातूर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या १२ जिल्हा परिषदांच्या आणि त्या जिल्ह्यातल्या पंचायत समितीच्या निवडणुका आयोगाने आज जाहीर केल्या.**




या निवडणुकांसाठी १६ जानेवारी पासून अर्ज भरायला सुरुवात होईल आणि २१ जानेवारीपर्यंत ऑफलाईन पद्धतीने अर्ज भरता येतील. २२ जानेवारीला अर्जांची छाननी होईल आणि २७ जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेता येतील. याचदिवशी अंतिम उमेदवारांची यादी जाहीर करणं, मतदान चिन्ह वाटप होईल. ३ तारखेला मध्यरात्रीपर्यंत उमेदवारांना प्रचार करता येईल आणि ५ फेब्रुवारीला सकाळी साडे ७ ते साडे ५ दरम्यान मतदान होईल. प्रत्येक मतदाराला जिल्हा परिषदेसाठी १ आणि पंचायत समितीच्या गणासाठी एक अशी दोन मते द्यावे लागतील.

या निवडणुकीत EVM चा वापर होणार असून विधानसभेच्या मतदार यादीत १ जुलै २०२५ रोजी नाव असलेल्या मतदारांना या निवडणुकीत मतदान करता येईल. 'माताधिकार' या मोबाइल ॲपवरुन मतदारांना त्यांचं नाव मतदार यादीत शोधता येईल. या निवडणुकांमध्ये २ कोटी ९ लाख मतदार असतील आणि त्यांच्यासाठी २५ हजार ४८२ मतदान केंद्र कार्यरत असतील. यासाठी १ लाख २८ हजार अधिकारी आणि कर्मचारी काम करतील, असं निवडणूक आयोगाने सांगितलं.

# नवी मुंबईत भाजपाच्या 'हिंदी सक्ती'च्या आश्वासनाविरोधात मनसे-ठाकरे गटचा निषेध

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे : राज्य सरकारने काही महिन्यांपूर्वी हिंदी सक्तीचा निर्णय लादण्याचा प्रयत्न केला होता. त्यावेळी ठाकरे बंधूंनी एकत्रित येत या निर्णयाला विरोध केला होता. आता पुन्हा महापालिका निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर हिंदी सक्तीचा विषय समोर आला आहे. नवी मुंबईत भाजपाच्या जाहीरनाम्यात बालवाडी पासून ते अगदी पदवी पर्यंतच्या शिक्षणात मराठीसह हिंदी भाषा सक्तीची करणार असल्याचे आश्वासन दिले आहे. भाजपाच्या या आश्वासनामुळे पुन्हा एकदा मनसे आणि शिवसेना (ठाकरे) पक्षाचे कार्यकर्ते आक्रमक झाले असून त्यांनी या जाहीरनाम्याचा निषेध केला आहे.**

नवी मुंबईतील मनसेचे नेते गजानन काळे यांनी या प्रकरणावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. ते म्हणाले, 'राज्य सरकारने काही दिवसांपूर्वीच हिंदी सक्तीचा निर्णय लादण्याचा प्रयत्न शालेय शिक्षणात केला होता. ज्याला दोनही ठाकरे बंधूंनी एकत्र येत कडाडून विरोध केला आणि राज्य सरकारचा तो डाव हाणून पाडला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची हीच जखम भरलेली नसावी. म्हणून नवी मुंबई भारतीय जनता पक्षाने जाहीरनाम्यात चक्क मराठी बरोबर केजी टू पीजी पर्यंत हिंदी भाषा सक्तीची करणार असे आश्वासन दिले असावे. ज्याचा निषेध आता शिवसेना आणि मनसे यूती म्हणून आम्ही केला आहे. आता फक्त हा जाहीरनामा आम्ही फाडलेला आहे. हा जाहीरनामा जाळण्याची परिस्थीती येऊ नये असे वाटतं असेल तर, भाजपाने तात्काळ ही गोष्ट जाहीरनाम्यातून वगळावी, असा इशारा काळे यांनी दिला आहे.'

**नवी मुंबई महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपाच्या जाहीरनाम्यात बालवाडीपासून पदवीपर्यंतच्या शिक्षणात मराठीसोबत हिंदी भाषा सक्तीची करण्याच्या आश्वासनामुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे. या आश्वासनाविरोधात मनसे आणि शिवसेना (ठाकरे) गट आक्रमक झाले असून, याआधी राज्य सरकारने केलेल्या हिंदी सक्तीच्या प्रयत्नाला ठाकरे बंधूंनी एकत्र येत विरोध केल्याची आठवण पुन्हा एकदा चर्चेत आली आहे.**

# महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वसई-विरार शहरात पोलीस रूट मार्च

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई :** वसई विरार महापालिका निवडणूक ही अंतिम टप्प्यात येऊन पोहचली आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात विविध पोलीस ठाण्यांच्यामार्फत रूट मार्च काढण्यात आला होता. निवडणुकीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी व कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये, याशिवाय नागरिकांनीही भयमुक्त वातावरणात मतदानासाठी बाहेर पडावे यासाठी हा रूट मार्च काढण्यात आला होता.

वसई विरार महापालिका निवडणुकीसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार आहे. याच पार्श्वभूमीवर शांतता सुव्यवस्था अबाधित राहावी, राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत व्हावी, याशिवाय नागरिकांनी भयमुक्त वातावरणात मतदानासाठी बाहेर पडावे, यासाठी वसई, विरार आणि नालासोपारा शहरातील प्रत्येक पोलीस ठाण्यामार्फत रूट मार्च काढण्यात आला.

यात पोलीस अधिकारी, अंमलदार, शिपाई यासह इतर पोलीस कर्मचारी उपस्थित होते. निवडणूक कालावधीत कायदा व सुव्यवस्था बिघडवणारा अनुचित प्रकार घडू नये व निवडणूक शांततेत पार पडावी यासाठी पोलिसांकडून सूचना करण्यात आल्या. जर एखादा अनुचित प्रकार घडत असेल त्याची माहिती त्वरित पोलिसांना कळवावी, असे आवाहनही नागरिकांना करण्यात आले.



# म्हसा विद्यालयाचे क्रीडा स्पर्धेत सुयश

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड** : दि. ९ जाने. रोजी 'जनसेवा प्रतिष्ठान, मुरबाड' आयोजित कला व क्रीडा महोत्सवांतर्गत विद्यामंदिर हायस्कूल, शिवळे येथे क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

मुख्याध्यापक आनंद जाधव यांच्या नियोजनानुसार १४ वर्षाखालील मुले व मुली कबड्डीचा संघ, १७ वर्षा खालील व खुल्या गटातील असे मुलींचे कबड्डीचे दोन संघ, आणि एक खो -खो संघ अशा एकूण पाच संघानी भाग घेतला होता. १४ वर्ष व १७ वर्ष वयोगटातील मुलींच्या दोन संघानी कबड्डी व १४ वर्ष वयोगटातील मुलींच्या खो- खो संघाने मैदानात क्रीडा नैपुण्य दाखवीत तीनही प्रथम क्रमांकाची पारितोषिके पटकावली. विद्यालयात मुख्याध्यापक आनंद जाधव यांनी या शैक्षणिक वर्षात सुरु केलेला विशेष क्रीडा प्रशिक्षण विभाग, विशेष क्रीडा प्रशिक्षक स्वप्निल गायकर, क्रीडा शिक्षक भानुदास लोहार, प्रा. जयेश खंडागळे व प्रसाद खारे या सर्वांच्या मेहनतीतून हे सुयश प्राप्त झाले आहे.

विजयी खेळाडूंचे मुख्याध्यापक, शिक्षक -शिक्षिका, ग्रामस्थ, व पालकांनी अभिनंदन केले आहे.

# जगदगुरू नरेंद्र महाराज संस्थानतर्फे रक्तदान शिबीर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**



**पेण** : तुम्ही जगा व दुसऱ्यांना जगवा या संकल्पाने प्रेरीत होऊन रक्तदान हे सर्व श्रेष्ठदान समजले जाते. राज्यात सध्या रक्ताचा तुटवडा भासत असल्याने जगद्गुरु श्रीमद रामानंदाचार्य नरेंद्रचार्यजी रामानंदाचार्य दक्षिण पीठ नाणिजधाम-महाराष्ट्र यांच्या कृपा आशिर्वादाने पेण तालुक्यातील वाशी व इतर गावामध्ये भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिराला युवकांचा चांगला प्रतिसाद लाभला. अनेक सामाजिक उपक्रमा सोबत दरवर्षीप्रमाणे रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते. नुकताच झालेल्या पेण तालुक्यात एकाच दिवशी रक्तदान शिबिरात वडखळ कॅम्प १७५ रक्त कुपिका वाशी कॅम्प १५१ रक्त कुपिका , दादर कॅम्प १०४ रक्त कुपिका रावे कॅम्प १०१ रक्त कुपिका गडब कॅम्प ८५ रक्त कुपिका कामार्ली कॅम्प ८२ रक्त कुपिका संकलन करण्यात आले.

मानवी जीवनात दानाचे महत्त्व अनमोल आहे. परंतु ज्या दानाने कुणाचे आयुष्य वाचते, ते रक्तदान सर्वश्रेष्ठ पुण्य ठरते. समाजात मायक्रोसाइटिक अनिमिया, सिकलसेल, थैलेसिमिया, हिमोफिलिया, ब्लड कॅन्सर, किडनी फ ऱ्ल्युअर अशा गंभीर आजारांशी झुंजणारे हजारो रुग्ण रक्ताच्या एका थेंबासाठी तडफडत असतात. अशा वेळी रक्त दाताच देवदूत ठरू शकतो म्हणून कॅम्पमध्ये जास्तीत जास्त रक्तदात्यांनी भाग घेऊन रक्तदान करावे अशी विनंती करण्यात आली आहे.

# मतदानाच्या दुसऱ्या दिवशी शिक्षकांना सुट्टी द्या

## - अनिल बोरनारे

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई** : महापालिका निवडणुकीतील कर्मचारी 14 व 15 जानेवारी रोजी सलग काम करणार असल्याने निवडणुकीच्या कामासाठी घेतलेल्या शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना निवडणुकीच्या दुसऱ्या दिवशी म्हणजेच 16 जानेवारी रोजी सुट्टी जाहीर करावी अशी मागणी मुंबई मुख्याध्यापक संघटना उत्तर विभागाचे अध्यक्ष अनिल बोरनारे यांनी केली आहे.



राज्यातील महापालिका निवडणुकांमध्ये मोठ्या प्रमाणात शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवा अधिग्रहित करण्यात आल्या आहेत. मतदानाच्या दिवशी मतदानाची वेळ संपली तरी प्रत्यक्ष प्रक्रिया त्यानंतरही अनेक तास सुरूच राहते. मतदानाच्या रांगेतील शेवटच्या माणसाचे मतदान होईपर्यंत प्रक्रिया चालते. त्यानंतर ईव्हीएम मशीन सील करणे, आवश्यक कागदपत्रे पूर्ण करणे, साहित्य सुरक्षितपणे मुख्य संकलन केंद्रावर जमा करणे, अहवाल सादर करणे या सर्व प्रक्रिया उशिरापर्यंत चालतात. उशिरापर्यंत काम करून लांब पल्ल्याचा प्रवास केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी नियमित कर्तव्यावर रुजू होणे त्यांच्यासाठी मानसिक व शारीरिकदृष्ट्या ताणदायक ठरते. त्यामुळेच निवडणुकीत काम करणाऱ्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मतदानाच्या दुसऱ्या दिवशी सुट्टी घोषित करावी अशी मागणी मुंबई मुख्याध्यापक संघटनेचे उत्तर विभाग अध्यक्ष अनिल बोरनारे यांनी केली आहे.

# जीवनदीप महाविद्यालयात जिजाऊ–विवेकानंद जयंती साजरी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**



**खर्डी** : जीवनदीप शैक्षणिक संस्था संचलित कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खर्डी याठिकाणी आज दि १२ जानेवारी २०२६ रोजी, सांस्कृतिक विभागामार्फत राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलास कळकटे यांनी विद्यार्थ्यांना राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांचे स्वराज्य स्थापनेतील योगदान याबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दीप्ती मोरे तर प्रास्ताविक प्रा. रेश्मा घोडविंदे यांनी केले. प्रा.मृणाल वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना उठा, जागे व्हा, थांबू नका असे विवेकानंद यांचे ब्रीदवाक्य समजावून सांगितले. कार्यक्रमासाठी प्राध्यापक व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

# ठाणे जिल्ह्यात महापालिका निवडणुकीच्या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : ठाणे जिल्ह्यातील महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025-26 अंतर्गत बुधवार,दि.15 जानेवारी 2026 रोजी होणाऱ्या मतदानाच्या दिवशी ठाणे जिल्ह्यातील महानगरपालिका कार्यक्षेत्रात सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. मतदारांना कोणत्याही अडचणीशिवाय आपला मतदानाचा हक्क बजावता यावा, तसेच मतदानाचा टक्का वाढावा, या उद्देशाने राज्य शासनाच्या निर्देशानुसार ही सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. या दिवशी शासकीय कार्यालये, निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम, बँका इ.ना सार्वजनिक सुट्टी लागू राहील, असे निवडणूक प्रशासनाने स्पष्ट केले आहे.नागरिकांनी या सुट्टीचा लाभ घेत प्रत्येक पात्र मतदाराने 15 जानेवारी 2026 रोजी आपल्या नजीकच्या मतदान केंद्रावर जावून निर्भयपणे मतदान करावे आणि राष्ट्रीय कर्तव्य म्हणून लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# जपूया सामाजिक बांधिलकीच्या वतीने गुण गौरव पुरस्कार प्रदान

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : "जपूया सामाजिक बांधिलकी" संस्थापक काजल राहुल प्रभाळे - घोलप संस्थापक आणि आयोजक तसेच संपूर्ण कोअर कमिटी यांच्या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून दर वर्षी प्रमाणे या वर्षी देखील सामाजिक गुण गौरव पुरस्कार "सोहळा माझ्या सखीचा" या कार्यक्रमातून सामाजिक गुण गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. यामध्ये संस्थेच्या महिलाना वर्षभर केलेल्या त्यांच्या विशेष कलागुणासाठी पुरस्कार देण्यात आला.

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकरांची त्रिशताब्दी महोत्सव विशेष म्हणून महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील काही विशेष कामगिरी केलेल्या महिलांना देखील अहिल्या शक्ती पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. यामध्ये सिंधुदुर्ग येथील पूजा गवस यांना कोकणातील खाद्य संस्कृती आणि पारंपरिक जीवनशैलीला जगभरात आपल्या रेड सॉइल चॅनेलच्या माध्यमातून जगभरात पोहोचवण्याचं काम केलं यासाठी त्यांना अहिल्या शक्ती पुरस्काराने पुरस्कृत केले गेले.

तसेच अवनी पाटील या इंजिनिअर असून देखील आपल्या आगरी भाषेत लग्नातील गाणी आपल्या भाषेतून आपली भाषा जिवंत ठेवण्यासाठी धवलारीन बाय म्हणून ओळखल्या जातात यांना देखील पुरस्कृत केले गेले.

ठाण्यातील अमृता मुळ्ये यांनी अगदी कमी वेळेमध्ये आपल्या ज्वेलरीचा ब्रँड बनवला आणि मेकअप आर्टिस्ट म्हणून त्यांनी आज वर हजारो मुलींना भारतातील आणि भारताबाहेरील राहणाऱ्या मुलींना प्रशिक्षण दिले. तसेच अश्या ज्यांनी अनेक मराठी कलाकारांना देखील आपल्या आपल्या ब्रँडची भुरळ पाडली अशा उद्योजक महिला म्हणून यांना देखील अहिल्या शक्ती पुरस्काराने पुरस्कृत करण्यात आले.

**नीता बोरसे या कल्याण मधील रहिवासी असून यांनी वयाच्या ४० शी नंतर आपल्या जलतरण प्रवास सुरू केला आणि आता पर्यंत १२ आंतरराष्ट्रीय सुवर्ण पदक मिळवले.**

नीता बोरसे या कल्याण मधील रहिवासी असून यांनी वयाच्या ४० शी नंतर आपल्या जलतरण प्रवास सुरू केला आणि आता पर्यंत १२ आंतरराष्ट्रीय सुवर्ण पदक मिळवले अशा भारतीयांचा अभिमान असलेल्या वयाच्या ५२ वर्षाच्या तरुणीला देखील अहिल्या शक्ती पुरस्कराने पुरस्कृत करण्यात आले.या कार्यक्रमाच्या वेळेस पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या पुस्तकाचे देखील प्रकाशन करण्यात आले हे प्रकाशन लघुउद्योगाचे महाराष्ट्र राज्य मंत्री जयदीप कवाडे नागपूर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळेस लघुउद्योग मंत्री जयदीप कवाडे यांना सन्मानित देखील करण्यात आले. यावेळेस त्यांनी महिलांचे कौतुक करताना असे पुरस्कार राज्य पातळीवर न होता राष्ट्रीय पातळीवर व्हायला पाहिजे यासाठी ते नक्कीच पुढच्या वेळेस स्वतःच लघुउद्योगाच्या माध्यमातून राष्ट्रीय पातळीवर असे पुरस्कार देण्याचे त्यांनी आश्वासन दिले आहे. त्याच प्रमाणे महिलांना शासकीय नवीन योजनाची माहिती येत्या मार्च मध्ये जाहीर होणार आहे त्याबद्दल संस्थेतील महिलाना त्याचा लाभ घेता येईल हे जाहीर केले.

# निवडणुकीमुळे पोलिसांच्या रजा रद्द

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता /ठाणे:** ठाणे शहर पोलिस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील ठाणे, कल्याण डोंबिवली, उल्हासनगर आणि भिवंडी निजामपूर महापालिका निवडणुकीमध्ये कोणताही अनुचित प्रकार घडू नये, निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पडावी, यासाठी पोलिस अधिकारी, कर्मचारी यांच्या साप्ताहिक सुटीसह सर्व प्रकारच्या रजा बंद केल्याची माहिती सूत्रांनी दिली. केवळ वैद्यकीय रजा यातून वगळण्यात आल्या आहेत.

**बंदोबस्तासाठी जास्तीतजास्त मनुष्यबळ** : ठाणे आयुक्तालयात पालिका निवडणुकीची मतदान प्रक्रिया आणि मतमोजणीच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी बंदोबस्तासाठी जास्तीत जास्त मनुष्यबळ उपलब्ध होणे आवश्यक आहे.आयुक्तालयातील नऊ हजार पोलिस अधिकारी, कर्मचारी यांच्या साप्ताहिक सुटीसह वैद्यकीय रजा वगळता सर्व रजा या १४ ते १६ जानेवारी या तीन दिवसांसाठी बंद केल्या आहेत.या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई केली जाणार असल्याची माहिती वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने दिली.

# पेण तालुक्यात एकही मतदारसंघ संवेदनशील नाही – उपविभागीय अधिकारी प्रवीण पवार

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : आगामी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणूक संदर्भात पेण तालुक्यात 173 मूळ मतदान केंद्र आणि 17 सहाय्यकारी मतदान केंद्र असे एकंदरीत 190 मतदान केंद्र असून पाच जिल्हा परिषद आणि 10 पंचायत समितीच्या मतदारसंघांमध्ये ही निवडणूक होत असून पेण तालुक्यात एकही संवेदनशील मतदारसघ नसून सर्व नागरिकांनी आदर्श आचारसंहितेचे पालन करावे असे आवाहन पेण उपविभागीय अधिकारी प्रवीण पवार यांनी पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले. या पत्रकार परिषदेला तहसीलदार तानाजी शेजाळ नायब तहसीलदार प्रसाद कालेकर नितीन परदेशी गटशिक्षणाधिकारी श्रीमती शर्मिला शेंडे उपस्थित होते.




पेण तालुक्यामध्ये जिल्हा परिषद मतदार संघामध्ये जिते, दादर, वडखळ, महलमी-या डोंगर आणि शिहू या पाच तर पंचायत समितीच्या गणामध्ये जिते वाकरूळ, रावे, दादर वाशी,वडखळ, महलमी-या डोंगर, वडगाव डोलवी शिव अशा दहा गणामध्ये निवडणूक होत असून १ लाख३९ हजार ४७९ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. यामध्ये ६९हजार५८१ पुरुष तर ६९ हजार ८९८ स्त्रीया मतदान करणार आहेत. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीकरता तीन फिरती पथके तीन व्हिडिओ सर्वेक्षण पथक त्याचबरोबर खारपाडा वाक्रुळ कोलेटी येथे तीन स्थिर पथक यांची नेमणूक केले असून उमेदवाराचा दैनंदिन खर्च स्थापन करण्यासाठी पथक नेमण्यात आलेला आहे. राजकीय पक्ष व उमेदवार यांना प्रचार आणि प्रसिद्धी परवानगी देण्याकरता एक खिडकी पथकाची स्थापना करण्यात आली असून एकही तृतीयपंथी मतदार आपल्या मतदारसंघांमध्ये नाही. उमेदवाराने आपले उमेदवारी अर्ज ऑफलाइन पद्धतीने उपविभागीय अधिकारी पेण कार्यालयामध्ये प्रत्यक्ष येऊन दाखल करणे.3 फेब्रुवारी रात्री दहा वाजेपर्यंत प्रचार संपणार असून 5 फेब्रुवारीला प्रत्यक्ष निवडणूक आणि ७ फेब्रुवारीला मतमोजणी होणार आहे.

# ५५२ उमेदवारांनी सादर केले खर्च

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

ठाणे : ठाणे पालिका निवडणुकीसाठी ६४९ उमेदवार रिंगणात आहेत. त्यातील केवळ ५५२ उमेदवारांनी खर्च सादर केला आहे. तर ९७ जणांनी अद्याप खर्च सादर केलेला नाही. ठाणे पालिकेच्या निवडणुकीत सहा उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. याठिकाणी आता तीन उमेदवारांनाच मतदान करावे लागणार आहे. बिनविरोधची जागा रिक्त ठेवण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. मतदान केंद्रावर मतदाराला मोबाइल घेऊन जाता येणार नाही.

# भिवंडीत निर्भय वातावरणात मतदान व्हावे यासाठी पोलिसांचा सशस्त्र रूटमार्च

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी** : भिवंडी शहर महानगरपालिकेची होणारी सार्वत्रिक निवडणूकीचे मतदान शांततापूर्ण व निर्भय वातावरणात संपन्न होण्यासाठी पोलीस यंत्रणा सुसज्ज झाली आहे.पोलीस उपाआयुक्त शशिकांत बोराटे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस दलाच्यावतीने ठिकठिकाणी सशस्त्र पथ संचालन करून नागरिकांनी निर्भयपणे मतदान करावे असे आवाहन पोलीस दलाच्यावतीने करण्यात आले आहे.तसेच शहरातील विविध ठिकाणी सशस्त्र पोलीस बंदोबस्त व सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आल्याची माहिती पोलिस उपआयुक्त शशिकांत बोराटे यांनी दिली.



भिवंडी शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीसाठी 15 जानेवारी रोजी मतदान केंद्रावर मतदान होणार आहे त्यासाठी भिवंडी महापालिका निवडणूक विभाग, निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय सज्ज झाली असुन मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी व भिवंडी पोलीस दलाच्यावतीने मतदान कामकाजाचा आढावा घेऊन संपूर्ण तयारी करण्यात आली आहे.मतपेटया शहरातील विविध मतदान केंद्रावर रवाना करण्यात आल्या आहेत.उद्या मतदान प्रक्रिया होणार असल्यामुळे ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, सह पोलीस आयुक्त ज्ञानेश्वर चव्हाण यांनी भिवंडी पोलीस उपआयुक्त शशिकांत बोराटे चर्चा करून कामकाजाचा आढावा घेऊन निवडणुका मतदान प्रक्रिया शांतता व निर्भय वातावरणात पार पाडाव्यात याबाबतीत मौलिक सूचना दिल्या त्या अनुषंगाने पोलीस उपाआयुक्त शशिकांत बोराटे, सहाय्यक पोलीस आयुक्त विजय मराठे, सचिन सांगळे व वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या उपस्थितीमध्ये शहरातील विविध भागात पोलीस पथकाने रूटमार्च करून मतदारांनी नागरिकांनी निर्भयपणे मतदान करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

### कडेकोट पोलीस बंदोबस्त

भिवंडीत महापालिका निवडणुकीसाठी सर्वत्र कडेकोट सशस्त्र पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आहे.मतदान व मतमोजणी साठी शहरात १ अतिरिक्त पोलीस आयुक्त,२ पोलीस उपायुक्त,८ सहाय्यक पोलीस आयुक्त,२५ पोलीस निरीक्षक,६० पोलीस उपनिरीक्षक असे ९६ पालिस अधिकारी तर १५५० पोलीस कर्मचारी, १०५० होमगार्ड तर ३ एसआरपीएफ कंपनीचे ३०० कर्मचारी असे २९०० कर्मचारी व ९६ पोलीस अधिकारी असे एकुण २९९६ अधिकारी व कर्मचारी भिवंडीत तैनात करण्यात आले आहेत. या व्यतिरिक्त २५ ड्रोन,५० कॅमेरे व १७०० सीसीटीव्ही यांची नजर शहरात असून नागरिकांनी कोणत्याही मोहाला व दबावाला बळी न पडता निर्भीडपणे मतदान करावे असे आवाहन पोलीस उपआयुक्त बोराटे यांनी दिली आहे.

**सन २०११ साली झालेल्या जनगणनेनुसार भिवंडीची लोकसंख्या ७ लाख १२ हजार आहे. तर या निवडणुकीसाठी ६ लाख ६९ हजार ०३३ मतदारांची नोंद झाली असून त्यामध्ये ३ लाख ८० हजार ६४३ पुरुष,२,८८,०९७ महिला आहेत तर इतर ३१३ मतदारांची संख्या आहे. या मतदारांमध्ये दुबार मतदारांची संख्या २७ हजार ३९४ आहे. या दुबार मतदारांच्या नावे पुन्हा मतदान होऊ नये म्हणून त्यावर स्टार मार्क केले असल्याची माहिती भिवंडी महानगरपालिकेच्या निवडणूक कार्यालयाने दिली आहे. १५ जानेवारी रोजी ९० नगरसेवकांसाठी २३ प्रभागात मतदान केंद्रावर मतदान होणार आहे.**




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024